सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयामधून तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय/दंतमहाविद्यालयाशी संलग्नित रुग्णालयातील औषधोपचारासाठी तसेच निरनिराळया वैद्यकीय सुविधांसाठी आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः- जिरुफी१०.००/प्र.क्र.-९०/२०००/आरोग्य-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- १० जुलै, २००१.

**वाचाः-** १) शासन निर्णय सा.आ.वि. क्र.- एचएफआर१०८७/३६५३/आरोग्य-९ दि.२ फेब्रुवारी ८८

२) संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्र-मआसेविप्र/प्रव्य कक्ष/रुग्ण फी वाढ/ २ ह/ दिनांक २२ फेब्रुवारी २००० चे पत्र.

**प्रस्तावनाः-**

गेल्या काही वर्षात शासनामार्फत राज्यातील पुरविण्यात येणा-या आरोग्य सुविधांमध्ये बरीच वाढ करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने यंत्रसामुग्री/साधनसामुग्रीच्या खर्चातही वाढ झालेली आहे व त्यामध्ये प्रतिदिन भर पडत आहे. या वाढलेल्या खर्चाचा भार पूर्णपणे शासनास उचलावा लागतो. तसेच आरोग्य संस्थेकडून उपचार घेणा-या रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून वाढलेल्या खर्चाचा भार काही प्रमाणात कमी करण्याच्या दृष्टीने हा भार रुग्णांनी काही प्रमाणात उचलणे आवश्यक झाले आहे. रुग्णांकडून शासनास मिळणा-या उत्पन्नात वाढ होवून त्या निधीचा उपयोग राज्यातील रुग्णालयात सुविधा वाढविण्यासाठी करण्याची आवश्यकता आहे . या सर्व बाबींचा विचार करुन शासकीय रुग्णालयातील औषधोपचारासाठी तसेच निरनिराळया वैद्यकीय सुविधासाठी आकारण्यात येणा-या शुल्क दरात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

30 JUL 2001

**शासन निर्णय :**

उपरोक्त बाबींचा विचार करुन रुग्णालय प्रशासन सुधारण्यासाठी तसेच चांगली व परिणामकारक अशी वैद्यकीय सेवा नागरिकांना पुरविण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, प्रादेशिक मनोरुग्णालये, कुटीर/ग्रामीण रुग्णालये, तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय/दंतमहाविद्यालयाशी संलग्नित रुग्णालयामध्ये आकारण्यात येणा-या फी चे सुधारीत दर खालीलप्रमाणे निर्धारित करण्यांत येत आहेत.

| अ. क्र | सेवा / सुविधा | जिल्हा/ स्त्री व इतर सामान्य रुग्णालये प्रस्तावित सुधारीत दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **बाहयरुग्ण नोंदणी (७दिवसांकरिता)** | रु.५/- |
| २ | **आंतररुग्ण** | |
| | १) आंतररुग्ण शुल्क प्रति दिन | रु.१०/- |
| | २)आहार शुल्क (सकाळचा चहा, नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण) | |
| ३ | **प्रयोगशाळा चाचण्या** | रु.१५/- |
| | **अ) रक्तचाचणी (प्रत्येकी)** | |
| | १) हिमोग्लोबिन | |
| | २) टिएलसी | |
| | ३) डीएलसी | |
| | ४) इएसआर | |
| | ५) रक्तगट व आरएच टेस्टींग | |
| | ६) रक्तातील रासायनिक द्रव्यांची चाचणी (शुगर, युरिया, प्रोटीन, सोडीयम, पोटेशियम इ.) | |
| | **ब)** लघवी, शौच, थुंकी, इत्यादी ओ.पी.डी.चाचण्या | रु.२०/- |
| | **क)** इतर विशेष रक्त चाचण्या | रु.२०/- |
| | **ड)** मलेरिया रक्त तपासणी | निशुल्क |
| | **इ)** सायटॉलॉजी | रु.३५/- |
| | **फ)** हिस्टोपॅथॉलॉजी | रु.३५/- |
| | **ग)** एलायझा चाचणी<br>(१) सर्वसाधारण<br>२) नाको | रु.५०/-<br>रु.१०/- |
| | **घ)** कल्चर सेन्सीटीव्हीटी | रु.४५/- |
| | **च)** प्रेगनन्सी टेस्ट | रु.४५/- |
| ४ | **क्ष- किरण विभाग** | |
| | १) क्ष-किरण चाचणी (स्टॅण्डर्ड) | रु.३०/- |
| | २) आय.व्ही.पी. | रु.१००/- |
| | ३) बेरियम स्वॅलो | रु.३०/- |
| | ४) बेरियम मिल | रु.५०/- |
| | ५) बेरियम एनिमा | रु.५०/- |
| | ६) अल्ट्रा सोनोग्राफी (१)पूर्ण<br>(२)अर्धा<br>(३)विशेष | रु.५०/-<br>रु.३०/-<br>रु.१००/- |
| | ७) सी.टी.स्कॅन (डोक्याचा) | रु.३००/- |
| | ८)सी.टी.स्कॅन (छातीचा/पोटाचा/पाठीच्या मणक्याचा) प्रत्येकी | रु.४००/- |

| | | |
|---|---|---|
| | ९) इ.सी.जी. | रु.२०/- |
| | १०) स्पायरोमेटरी | रु.५०/- |
| | ११) लंग्ज फंक्शन टेस्ट | रु.५०/- |
| | १२) दातांची क्ष-किरण चाचणी | रु.२०/- |
| ५ | **शस्त्रक्रिया** | |
| | १) भूल देवून करण्यात येणाऱ्या मोठ्या शस्त्रक्रिया | रु.१६०/- |
| | २) भूल देवून करण्यात येणाऱ्या छोटया शस्त्रक्रिया | रु.६०/- |
| | ३)बाहयरुग्ण विभागात करण्यात येणाऱ्या छोटया शस्त्रक्रिया | रु.३०/- |
| ६ | **बाळंतपणे** | |
| | अ) पहिले बाळंतपण (प्रत्येकी) | निशुल्क |
| | ब) दुसरे बाळंतपण (प्रत्येकी) | रु.५०/- |
| | क) तिसरे बाळंतपण व पुढे (प्रत्येकी) | रु.२५०/- |
| ७ | **नर्सिंग होम चार्जेस** | |
| | अ) सर्वसाधारण कक्षातील साईड रुम | रु.६०/- |
| | ब) नर्सिंग होम (वातानुकुलीत नसलेली रुम) | रु.७५/- |
| | क) वातानुकुलीत रुम | रु.१५०/- |
| ८ | **रुग्णवाहिका शुल्क (प्रती कि.मी.)** | रु.५/- |
| ९ | **प्रतिक्षा शुल्क (आठ तासापुढे)** | रु.३०/- प्रती तास |
| १० | **विशेष उपचार / तपासणी** | |
| | अ) अतिदक्षता विभाग (प्रतिदिन) | रु.१००/- |
| | ब) कान, नाक व घसा यासंबंधीच्या चाचण्या | रु.२०/- |
| ११ | **नेफ्रॉलॉजी विभाग** | |
| | अ )हिमोडायलीसीस (प्रत्येकी) | रु.१५०/- |
| | ब) पेरीटोनीयल डायलीसीस (प्रत्येकी) | रु.५०/- |
| | क) सर्व प्रकारचे शंट | रु.१००/- |
| | ड) बायोप्सी | रु.५०/- |
| १२ | **न्युरॉलॉजी विभाग** | |
| | अ) नर्व्ह फंक्शन | रु.१२०/- |
| | ब) इ.एम.जी. | रु.६०/- |
| | क) इ.इ.जी. | रु.१२०/- |
| | ड)मसल / नर्व्ह बायोप्सी | रु.१५०/- |
| १३ | **फिजीओथेरापी व ऑक्युपेशन थेरापी विभाग** | |
| | अ)फिजीओथेरेपी(प्रत्येक सीटींग साठी) | रु.१०/- |
| | ब) कॅलीपर्स (प्रत्येकी) | रु.१००/- |
| | क)इंडोस्कोपी (प्रत्येकी) (ब्रान्कोस्कोपी, गॅस्ट्रोस्कोपी, सिस्टोस्कोपी) | रु.१००/- |
| १४ | **दंत विभाग** | |
| | अ) दात काढणे (प्रत्येकी) | रु.१५/- |
| | ब) दाताची कवळी बसविणे (वरची व खालची) | रु.१५०/- |

| | | |
|---|---|---|
| | क) अंशिक कवळी बसविणे | रु.५०/- |
| | ड) चांदी भरणे | रु.५०/- |
| | इ) सिमेंट भरणे | रु.२०/- |
| | ई) रुट कॅनल ट्रिटमेंट | रु.१००/- |
| | प) स्केलींग अँड पॉलिशिंग | रु.२५/- |
| | फ)रक्त बॉटल पुरविणे | रु.४२५/- |
| **१५** | **वैद्यकीय प्रमाणपत्र** | |
| | १)आजाराचे प्रमाणपत्र (३ महिन्यापर्यंत) | रु.२५/- |
| | २) वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र | रु.५०/- |
| | ३) रेफ्री मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र | रु.१५०/- |
| | ४) राज्य स्तरावरील वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र | -- |
| | ५)विभागीय वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाविरुध्द अपिल करणे. | रु.२००/- |
| | ६) फीटनेस प्रमाणपत्र | रु.५०/- |
| | ७) रुग्णालयात भरती झाल्याचे प्रमाणपत्र | रु.१०/- |
| | ८) रुग्णालयातून डिसचार्ज दिल्याचे प्रमाणपत्र | निशुल्क |
| | ९) (अ) रुग्णपत्रिकेचे कागदपत्र देणे (५ पानापर्यंत)<br>(ब)पुढील प्रत्येक पानाकरिता (झेरॉक्स कॉपी) | रु.२०/-<br>रु.१/-(प्रति पान) |
| | १०) अपंगत्वाचे प्रमाणपत्र | निशुल्क |
| | ११) वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळण्यासाठी प्रमाणपत्र | बिलाच्या ३ टक्के |
| | १२) याव्यतिरिक्त लागणारे कोणतेही प्रमाणपत्र<br>(वयाच्या दाखल्यासह)<br>वरिष्ठ नागरिकांसाठी | रु.५०/-<br><br>रु.२५/- |
| **१६** | **<u>मृत शव खाजगी संस्थांना (एम्बाल्मींग) अभ्यासासाठी देणे.</u>** | रु.१५००/- |
| **१७** | **एम.आर.आय. चाचणी** | रु.१६००/- |
| **१८** | **<u>सिरॅमोमेटल लॅबमधील उपचार</u>**<br>**अ) फिक्स प्रास्थेटिक रिस्टोरेशन्स** | |
| | १) मेटल रिस्टोरेशन्स --(क्राऊन्स / रिटेनर्स / पॉन्टीक)<br>२)मेटर रिस्टोरेशन्स विथ ॲक्रीलिक फेसींग--<br>३) मेटल सिरॅमिक रिस्टोरेशन्स | रु.५००/-<br>रु.५००/- प्रत्येकी<br>रु.५००/- |
| | **ब) रिमोव्हेबल कास्ट मेटल रिस्टोरेशन्स**<br>१) रिमोव्हेबल कास्ट मेटल<br>पार्शीअल डेंचर --<br>२) मेटल बेज सिंगल कम्प्लीट डेंचर<br>३) ऑबटयुरेटर फ्रेम वर्क इन मेटल विथ - ॲक्रीलायझेशन | <br>रु.१,१००/-<br><br>रु.१,५००/-<br>रु.१,१००/- |
| **१९** | **लिथोट्रिप्सी** | रु.१,०००/- |
| **२०** | **जॉईन्ट रिप्लेसमेंट** | रु.४०,०००/- |

२. त्याचप्रमाणे पुढील प्रस्तावानाही शासन मान्यता देत आहे.

-923-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या रुग्णालयांमधून जे रुग्णशुल्क जमा होईल ते जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक यांच्या "स्वीय प्रपंजी" खात्यात जमा करुन त्यातून दैनंदिन कारभार व साधनसामग्री खरेदी (विहित पध्दतीने) करण्यासाठी वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

स्वीय प्रपंजी लेखा उघडण्यासाठी रितसर परवानगी घेण्यांत यावी. त्याच धर्तीवर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक रुग्णालयांमधून जमा होणारे रुग्णशुल्क संबधित अधिष्ठाता यांच्या स्वीय प्रपंची खात्यात जमा करुन त्यातून साधनसामुग्री व दैनंदिन कारभार व्यवस्थित ठेवण्याच्या दृष्टीने वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(२) यापूर्वी शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार ज्या संवर्गांना विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सवलत देण्यात आली आहे. ती यापुढेही परिशिष्ट "अ" प्रमाणे (सोबत जोडले आहे) चालू ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

(३) ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- किंवा त्याहून कमी आहे अशा रुग्णांना किंवा अन्न व नागरी पुरवठा विभागाने वितरित केलेल्या पिवळया रेशनकार्ड धारक रुग्णांना दारिद्रय रेषेखालील असे समजण्यांत येईल व त्यांना मोफत आरोग्य सुविधा पुरविण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

(४) तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील रुग्णालयांमधून पुरविल्या जाणाऱ्या विविध सुविधांसाठी आकारण्यांत येणाऱ्या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

(५)प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे येथे प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. तेथे सर्वसाधारणत: दारिद्रय रेषेखालील रुग्णांवर उपचार करण्यात येत असल्यामुळे त्यांना वगळून प्रस्तावित रुग्णशुल्क वाढ ही राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, प्रादेशिक मनोरुग्णालये, ग्रामीण / कुटीर रुग्णालये,तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय /दंत महाविद्यालयाशी संलग्नित रुग्णालये व इतर रुग्णालये यांना लागू करण्यात येत आहे.

प्रस्तावित शुल्क आकारणी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

एल. जी. इप्पेवार
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रति,
राज्यपालांचे सचिव.
सर्व विभागाचे आयुक्त.

९२५- ९८८-

## परिशिष्ट - अ

शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार ज्या संवर्गांना विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सवलत देण्यांत आलेली आहे त्या संवर्गाबाबतचा तपशील :-

१) शासकीय कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणारे कुटुंबिय

२) मानसेवी वैद्यकीय अधिकारी व शासकीय रुग्णालय व दवाखान्यातील परिचर्या कर्मचारी वर्ग

३) वैद्यकीय, निमवैद्यकीय तसेच व्यवसायोपचार व भौतिकोपचार विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी

४) न्यायाधिशांचे आदेशान्वये स्थानबध्द व्यक्ती

५) स्वातंत्रसंग्राम सैनिक व त्यांचे कुटुंबिय

६) न्याय वैद्यकीय प्रकरणातील औषधोपचारासाठी पाठविलेल्या व्यक्ती व न्याय चौकशी अधिन कैदी.

७) पोलिसांतर्फे येणाऱ्या मेडिको लिगल केसेस.

८) सुधारगृहातील रुग्ण

९) कुष्ठरोग मंडळाकडून येणारे रुग्ण

१०) महिला सुधारगृहातर्फे येणारे रुग्ण

११) नागरी विभागातील बेवारशी मुले

१२) आश्रमशाळेतील रुग्ण

१३) आमदार व खासदार, मंत्री, सभापती व माजी आमदार.

१४) न्यायाधीश.

---

एच–321(1500–7–01)4.